# तथ्यांच्या विश्वसनीयतेवर संशोधनाची गुणवत्ता

## विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांचे प्रतिपादन : कमला कॉलेजमध्ये कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे. संशोधनासाठी संकलित केली जाणारी तथ्य महत्वाची असतात. संशोधनासाठी प्राथमिक तथ्य व दुय्यम तथ्य संकलन उपयोगी असते. प्राथमिक तथ्यातून संशोधन समस्यांची उकल शास्त्रशुद्ध होते. संशोधनामध्ये मिळणारी तथ्य जेवढी विश्वसनीय पद्धतशीर असतील तेवढी संशोधनाची गुणवत्ता वाढते, असे प्रतिपादन विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले.

कमला कॉलेज 'संशोधनासाठी माहितीचे संकलन आणि विश्लेषण' या विषयावरील कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. चर्चासत्राचे उद्घाटन संस्थेचे सचिव क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. कांबळे म्हणाले, संशोधनामध्ये प्रश्नावलीला अधिक महत्व असते. तथ्य संकलनासाठीची प्रश्नावली समस्यांचा शोध घेणारी व कमी खर्चित सोप्या भाषेतील असावी. त्यामुळे चांगला प्रतिसाद मिळतो. याशिवाय यांत्रिक शोध सादाने, प्रक्षेपण तंत्र संदर्भ ग्रंथ, जर्नल्स, वार्षिक अहवाल, तज्ज्ञांचे अभिप्राय महत्वाचे ठरतात. संशोधन समस्यांकडे निरपेक्ष भावनेने पहावे, संशोधकाची दूरदृष्टी, तर्क संशोधनाचे आधार ठरतात.




कोल्हापूर : कमला कॉलेजमधील आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. क्रांतिकुमार पाटील. सोबत डॉ. नेताजी पोवार, डॉ. अनघा पाठक, डॉ. एस. एन. पोवार, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. जे. बी. पाटील.

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांच्या संशोधनात फरक असतो. शास्त्रीय संशोधने तंतोतंत असतात. सामाजिक संशोधनाला मर्यादा येतात. त्यांचा विचार करून संशोधन करावे. समाजामध्ये नवनवीन समस्या उभ्या आहेत. अगदी जाहिरातीपासून नोटाबंदीपर्यंच्या अलीकडील घटनांचा समाज जीवनावर होणारा परिणाम यावर संशोधन करता येते. समाजामध्ये नव्या संशोधकाला आधारभूत संशोधन करावे. संशोधनामध्ये नाविन्याची दृष्टी हवी. नव्या संशोधकांनी अशा चर्चासत्रामधील माहितीचा वापर संशोधनात करावा. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. अरुण बसुगडे यांनी संख्याशास्त्रामधील मूलभूत तत्वांचा आढावा घेतला. त्यांनी मिळालेली तथ्य संख्याशास्त्राव्दारे कशी मांडायची याविषयी माहिती देऊन, संख्याशास्त्राच्या आधारावर संशोधनाची विश्वसनियता तपासून सिद्ध करावी, असे सांगितले. तसेच त्यांनी वेगवेगळ्या आलेखांचा दाखला देवून संशोधनाची मांडणी केली.

यावेळी डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, डॉ. अनघा पाठक, डॉ. नेताजी पोवार, प्रा. एन. एस. शिरोळकर, डॉ. सुजय पाटील, प्रा. अनिल घस्ते, प्रा. टी. एस. थोरात आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner